सहायक आयुक्त (तांत्रिक) (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदल्या व नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः माअअ-२०१८/(८७/२०१८)/पदुम-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख:- ३१ मे, २०१८.

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने मत्स्यव्यवसाय विकास विभागातील सहायक आयुक्त (तांत्रिक) (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदलीने नियुक्त्या / पदस्थापनेत बदल खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ.क्र	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.अ.पा.नाखवा	सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, दापचरी	सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, पुणे.	श्री.वि.बा.शिखरे यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या पदी. (विनंतीनुसार)

२. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, श्री.नाखवा यांना श्री.शिखरे यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्यावर सध्याच्या पदावरुन कार्यमुक्त करावे.

३. संबंधीत अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

४. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम

१९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०६०१११२६२११४०१** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay K. Chaudhari

Digitally signed by Vijay K. Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, cn=Vijay K. Chaudhari
Date: 2018.06.01 11:25:22 +05'30'

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर / पुणे.
३. श्री.अ.पां.नाखवा, प्रकल्प व्यवस्थापक दापचरी, पालघर.
४. निवडनस्ती पदुम-१२.